महाराष्ट्र शासन

क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३०/न.वि.-४
नगर विकास विभाग, मुख्य इमारत
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २२ जुलै,२०२०.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

**विषय:- नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांना मंजूर निधीच्या विनियोगाबाबत.**

संदर्भ -१. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३०/न.वि.-४, दिनांक ११ जून,२०२०.

महोदय,

नगर विकास विभागाकडून सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ , सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने कामे पूर्ण करून निधी खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च,२०२१ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबच्या सविस्तर सूचना संदर्भाधीन क्र. (१) अन्वये देण्यात आल्या आहेत.

२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने, शासनास प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

(अ) सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ , सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षांमध्ये शासनाकडून ज्या कामांकरीता निधी वितरीत करण्यात आला आहे, अशी सर्व कामे ज्या टप्प्यावर प्रलंबित आहेत ( उदा: तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता,निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश इ. ) त्या टप्प्यापासून पुढे नियमोचित कार्यवाही करून कामे पूर्ण करण्यात यावी व निधी विहीत मुदतीत खर्च करण्यात यावा.

(ब) संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णय हा शासनाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला आहे.त्यामुळे सदरचा निधी समर्पित न करता विहीत मुदतीत खर्च करण्याची दक्षता घेण्यात यावी.

३. सबब,संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

आपला,
22/07/2020
(विवेक कुंभार)
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

Scanned with CamScanner